# अर्थशास्त्र
## बी.ए. तृतीय वर्ष (सेमिस्टर VI)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## भारतीय कर रचना
## (Indian Tax Structure)

पूर्वी सरकारच्या कार्याचा विस्तार हा फार मर्यादित होता. आज काळ व परिस्थितीनुरुप विचारही बदलले. त्यामुळे सरकारच्या जबाबदाऱ्या वाढल्यामुळे सरकारच्या कार्यातही वाढ झालेली आहे. त्यामुळे या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करणे भाग पडते. हा खर्च भागविण्यासाठी सरकार उत्पन्नाच्या निरनिराळ्या साधनांचा उपयोग करुन घेते. त्या साधनांमध्ये कर हे सर्वात महत्वाचे साधन होय.

केंद्र सरकार व राज्य सरकारांना कर व करेतर अशा दोन साधनांच्याद्वारा उत्पन्न प्राप्त होते. या दोन साधनात कर हे अत्यंत महत्वाचे साधन समजल्या जाते. १९५०-५१ मध्ये केंद्र सरकारच्या एकूण उत्पन्नात करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा ९० टक्के होता. तर १९७३-७४ मध्ये तो ७८ टक्के झाला. त्याचप्रमाणे राज्य सरकारच्या १९६५-६६ च्या एकूण उत्पन्नात करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा ५० टक्के होता तो १९७२-७३ मध्ये ६४ टक्के झाला.

भारतीय संविधानानुसार केंद्र व राज्यांच्या दरम्यान उत्पन्न प्राप्त करण्याच्या साधनांचेही विभाजन करण्यात आले आहे. त्यानुसारच केंद्र सरकार व राज्य सरकार करांची

आकारणी करतात. भारतातील कर रचनेचे समग्र स्वरुप समजण्यासाठी केंद्र व राज्य सरकार आकारीत असलेल्या करांची माहिती करुन घेणे आवश्यक आहे.

## केंद्र सरकारचे कर

### १) उत्पन्न कर

**(Income Tax)**

केंद्र सरकारने आकारलेल्या प्रत्यक्ष करांमध्ये उत्पन्न कर किंवा प्राप्ती कर हा सर्वात महत्वाचा मानला जातो. उत्पन्न कर भारतात सर्वप्रथम इ. स. १८६० मध्ये लावण्यात आला होता. नागरिक, अविभाजीत हिंदू कुटूंब, भागीदारी संस्था व इतर व्यावसायिक संघटनांनी दरवर्षी मिळविलेल्या शुद्ध उत्पन्नावर प्राप्ती कराची आकारणी केली जाते. व्यक्तीचे संपूर्ण उत्पन्न हे शुद्ध उत्पन्न मानले जात नाही. उत्पन्न कर लावतांना किमान उत्पन्न करमुक्त करण्यात आलेले आहे. करमुक्त उत्पन्न वगळता उरलेल्या उत्पन्नावर कर आकारल्या जातो. निरनिराळ्या उत्पन्न श्रेणीसाठी (Income Slabs) प्राप्ती कराचे दर वेगवेगळे असतात. प्राप्ती कराची आकारणी व वसूली केंद्र सरकारकडूनच केली जाते. वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार हे उत्पन्न केंद्र व राज्य सरकार यांच्यात वाटले जाते. सहाव्या वित्त अयोगाच्या शिफारशीनुसार उत्पन्न करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या ८० प्रतिशत उत्पन्न सर्व राज्यांना वाटून दिले जाते. प्राप्तीकर भरणाऱ्या नागरिकांना विशिष्ट दराने सरचार्जही द्यावा लागतो. सरचार्ज लावल्यामुळे हे सर्व उत्पन्न फक्त सरकारलाच प्राप्त होते.

उत्पन्न कराच्या आकारणीबद्दल अनेक आक्षेप घेण्यात येतात. भारतात प्राप्तीकराच्या आकारणीचा दर हा गैरवाजवी आहे. प्रा. कॉल्डोर यांच्या मते सरकारने प्राप्ती कराच्या जास्तीत जास्त दर ४५ टक्के ठेवावा.

## २) भांडवली लाभ कर

**(Capital Gains Tax)**

इ. स. १९४७-४८ मध्ये प्रथमच भांडवली लाभावर कर बसविण्यात आला. परंतु दोन वर्षानंतर तो रद्द करण्यात आला. बऱ्याच विवादानंतर १९५६ मध्ये प्रा. कॉल्डोर यांनी केलेल्या कर सुधारणेच्या शिफारशीत भांडवली लाभ कर पुन्हा सुरु करण्यात आला.

भांडवली संपत्तीच्या (Capital Assets) विक्रीमुळे किंवा स्थानांतरणामुळे होणाऱ्या लाभावर हा कर लावण्यात येतो. थोडक्यात व्यावसायिकाला ह्या पद्धतीने मिळणाऱ्या नफ्यावर (लाभावर) आकारण्यात येणाऱ्या कराला 'भांडवली नफ्यावरील कर' असे म्हणतात. भांडवली संपत्तीत प्रामुख्याने जमीन, इमारती, यंत्रसामुग्री, अंश, स्कंध (Stock) व रोख्यांचा समावेश होतो.

## ३) संपत्ती कर

प्रा. कॉल्डोर यांनी १९५६ मध्ये संपत्ती कर लावण्याची शिफारस केली होती. प्रा. कल्डोर यांनी एक लाख रु. किंमतीच्या संपत्तीवर संपत्ती कर आकारण्यात येऊ नये. शुद्ध संपत्तीच्या १ ते ५ लाख रुपयांवर १ प्रतिशत संपत्ती कर लावला जातो. सर्वात वरच्या शिलेवर (Slab) ५ प्रतिशत संपत्ती कर द्यावा लागतो. काळानुसार या दरात सतत परिवर्तन होत गेले. समतेच्या तत्वाचे पालन व्हावे ह्याकरिता संपत्ती कराची आकारणी करीत असतांना सर्व प्रकारच्या संपत्तीचा विचार करण्यात यावा. असेही कॉल्डोर यांनी सुचविले.

१९९२-९३ पासून डॉ. मनमोहन सिंग यांनी शेअर्स आणि अन्य प्रकारच्या संपत्तीवरील करबंद केला आणि राहते घर, अतिथी गृहे आणि दागदागिने यावरील करांवर मर्यादा घातली. १९९३ एप्रिल पासून १५ लाखापेक्षा जास्त संपत्तीवर १ टक्का दराने

संपत्ती कर आकारण्यात येत आहे. या संपत्ती करामुळे काही प्रमाणात का होईना संपत्ती विषयक विषमतेची दरी कमी करणे शक्य झाले आहे.

### ४) मालमत्ता कर

**(Estate Duty)**

वरसा हक्काच्या नियमानुसार व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्या व्यक्तीची संपत्ती तिच्या वारसदारांना मिळते. ज्या व्यक्तीला वारसाहक्काने संपत्तीचे हस्तांतरण होते त्या व्यक्तीला (इस्टेट डुटी) मालमत्ता कर द्यावा लागतो. केंद्र सरकार या कराची आकारणी करते व राज्य सरकारला याचे उत्पन्न हस्तांतरित करते. १९५३ पासून मालमत्ता कराची आकारणी करण्यास सुरुवात झाली. हा कर पुरोगामी स्वरुपाचा असून यात जास्त प्रमाणात संपत्ती प्राप्त करणाऱ्या वारसांना जास्त कर द्यावा लागतो. मालमत्तेच्या बाबतीत असणारी विषमता मालमत्ता करामुळे दूर होऊ शकते.

### ५) देणगी कर

**(Gift Tax)**

प्रा. कॉल्डोर यांनी केलेल्या शिफारशीनुसार १९५८ मध्ये हा कर लावण्यात आला. हा कर संपत्तीकर आणि मालमत्ता करास पुरक आहे. उत्पन्न मिळविण्याच्या दृष्टीने हा कर गौण स्वरुपाचा ठरतो. केवळ मालमत्ता कर व संपत्ती कर चुकविण्याची प्रवृत्ती रोखणे हा या करांचा प्रमुख उद्देश आहे. देणगी कराचे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे हा कर देणाऱ्यावर लावण्यात येत असे. त्यानंतर १९९०-९१ मध्ये देणगी करात बदल करण्यात आले असून देणगी कर हा देणगी घेणाऱ्यावर लावण्यात येईल व देणगी देणाऱ्याला कर द्यावा लागणार नाही. असा निर्णय घेण्यात आला. देणगीतून सूट प्राप्त रक्कम वाढविण्यात आली आणि देणगी कराचा दर देखील कमी करण्यात आला. परंतु १९९८-९९ पर्यंत याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. परंतु १९९९ मध्ये श्री. यशवंत सिन्हा वित्तमंत्री

असतांना त्यांनी हा करबंद करुन देणगीची रक्कम ही देणगी प्राप्त करणाऱ्या व्यक्तीच्या अधिक करण्यात यावी असा निर्णय घेतला.

## ६) केंद्रिय उत्पादन कर

**(Central Duty)**

केंद्रिय उत्पादन कर हा केंद्र सरकारच्या उत्पन्नाचा एक विशेष महत्वाचा स्त्रोत आहे. अंमली वस्तू वगळल्यास देशात उत्पादन होणाऱ्या वस्तूंवर कर आकारणी करण्याचा अधिकार केंद्र सरकारचा आहे. उत्पादन करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ठराविक हिस्सा राज्यांमध्ये व केंद्रांमध्ये वाटला जातो. अल्कोहोलीक पेये, दारु, अफू आणि मादक पदार्थ यावर अबकारी शुल्क आकारण्याचे अधिकार राज्य सरकारचे आहे. अबकारी शुल्क न देता वस्तू गोदामात ठेवता येतात परंतु वस्तू गोदामातून बाहेर काढतांना मात्र त्यावर अबकारी शुल्क द्यावे लागते.

उत्पादन कराच्या आकारणीमुळे केंद्रिय सरकारच्या तिजोरीत दरवर्षी मोठ्या प्रमाणात भर पडते. १९५०-५१ मध्ये ७० कोटी रु. उत्पन्न सरकारला मिळाले परंतु औद्योगिकरणाचा मोठ्या प्रमाणात वेग वाढून अबकारी दराचे शुल्क कमी होऊन देखील त्यापासून प्राप्त होणाऱ्या उत्पादनात मात्र प्रचंड प्रमाणात वाढ झाली. २०११-१२ मध्ये केंद्र सरकारला अबकारी शुल्कापासून १,६४,११६ कोटी रु. उत्पन्न प्राप्त होईल असा अंदाज होता. एवढे असले तरी उत्पादन करामुळे वस्तूंच्या किमती वाढल्या, महागाई वाढत गेली व याचा परिणाम गरीब व मध्यम वर्गीयांवर झाला. हेही मान्य करावेच लागते.

## ७) केंद्रिय सीमा शुल्क

**(Central Customs Duty)**

देशातून विदेशात निर्यात होणाऱ्या आणि विदेशातून देशात आयात होणाऱ्या वस्तूंवर हा कर लावला जातो. हे कर मूल्यानुसार वा मात्रानुसार आकारले जातात. देशातील उद्योगांना सरंक्षण देण्याच्या धोरणामुळे आयात कराचे प्रमाण वाढले असून निर्यात वाढीसाठी निर्यात कर कमी केलेत.

सीमा शुल्क हे ब्रिटीशांच्या राजवटीत सुरु झाले ब्रिटीशांनी सर्वप्रथम १७८६ मध्ये कलकत्याला सीमा शुल्क मंडळाची स्थापना केली. १९६२ मध्ये जमीन, समुद्र आणि हवाई सीमा शुल्कासाठी एकत्रित सीमा शुल्क कायदा लागू करण्यात आला. जास्त दराने सीमा शुल्काची आकारणी ही उत्पादकतेला मारक ठरते. तसेच त्यामुळे चोरटा व्यापार, सीमा शुल्क चोरी यांच्या प्रमाणात वाढ होते.

भारत सरकारला १९५०-५१ मध्ये केवळ १६० कोटी रु. एवढेच उत्पन्न सीमा शुल्कापासून मिळाले त्यात सातत्याने वाढ होत जावून २०११-१२ मध्ये यापासून सरकारला १,५१,००० कोटी रु. उत्पन्न मिळेल असा अंदाज होता.

यावरुन असे दिसून येते की, केंद्र सरकारच्या कार्याचा विस्तार वाढत चालल्याने ती कार्य पूर्ण करण्यासाठी अधिक उत्पन्नाची केंद्राला आवश्यकता भासत आहे. परिणामत: करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होत आहे. करांपासून मिळणारे उत्पन्न वाढवितांना अप्रत्यक्ष करांवर केंद्र सरकार अधिक विसंबून राहत आहे. त्यामुळे निम्न व मध्यम स्तरातील व्यक्तींवर करभार सारखा वाढत असल्याचे दिसून येते.

# राज्य सरकारचे कर

केंद्र सरकारने आकारलेल्या काही करांमुळे केंद्र सरकारला मिळालेल्या उत्पन्नातुन काही वाटा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना दिला जातो. अलीकडच्या काळात राज्याने कल्याणकारी राज्यांची संकल्पना मान्य केल्यामुळे त्यांना कराव्या लागणाऱ्या खर्चातही वाढ झाली आहे. हा खर्च भागविण्यासाठी राज्य सरकारला काही करांची आकारणी स्वतंत्रपणे करावी लागते. ते कर पुढीलप्रमाणे

## १) शेतसारा

**(Land Revenue)**

शेतसारा हा अत्यंत जुना कर आहे. शेतसारा हा भू-धारण पद्धतीवर अवलंबून असतो. शेतसारा हा पूर्वी राज्यांच्या उत्पन्नाचा महत्वपूर्ण स्त्रोत होता. जमीन मालक असणारा प्रत्येक शेतकरी सरकारला शेतसारा देत असतो. भारतातील शेतकरी अनेक वर्षापासून शेतसारा देत आहे. त्यामुळे या कराची शेतकऱ्यांना सवय झाल्यामुळे या कराचे ओझे वाढत नाही.

शेतसारा निर्धारित करण्याचा आधार वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळा आहे. ज्या आधारावर शेतसाऱ्याची रक्कम ठरवली जाते तो आधार सर्व राज्यांमध्ये समान असायला हवा पाच एकरापर्यंत जमीन असलेल्या व कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्याचा शेतसारा माफ झाल्यास लक्षावधी शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

## २) कृषी उत्पन्न कर

**(Agriculture Income Tax)**

शेतीतून मिळणाऱ्या शुद्ध उत्पन्नावर हा कर लावण्यात येतो. कर चौकशी आयोगाने शेतसारा व्यवस्था अधिक न्यायपूर्ण करण्याची व राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषी उत्पन्न कराची शिफारस केली.

केंद्र सरकारने प्रा. के. एन. राज यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने कृषी उत्पन्न कराच्या आकारणीबद्दल काही उपयुक्त शिफारशी केल्या होत्या. शेतीवर 'शेती धारण क्षेत्र कराची' (Agriculture Holding Tax) आकारणी करण्यात यावी असे या समितीने सुचविले. शेतीपासून मिळणारे उत्पन्न व शेतीशिवाय मिळणारे उत्पन्न एकत्र करुन नंतर कर आकारणी करावी अशी राज समितीची दुसरी शिफारस होती.

## ३) उत्पादन कर

**(Excise Duty)**

मादक पदार्थांच्या उत्पादनावर कर आकारण्याचा अधिकार राज्य सरकारांना आहे. दारु, अफू, गांजा व इतर मादक पदार्थांचे राज्यामध्ये उत्पादन झाल्यास त्यावर उत्पादन कर लावला जातो. उत्पादन कर हा राज्य सरकारच्या दृष्टीने एक महत्वाचा उत्पन्न स्त्रोत आहे.

## ४) विक्री कर

**(Sales Tax)**

राज्य सरकारांच्या दृष्टीकोनातून विक्रीकर हा उत्पनाचा सर्वात मोठा स्त्रोत होय. भारतीय घटनेने वर्तमान पत्रांचा अपवाद वगळता इतर सर्व वस्तूंच्या विक्रीवर कर आकारणी करण्याचा अधिकार राज्यांना देण्यात आला.

आंतरराज्यीय व्यापाराच्या बाबतीत वस्तूची विक्री व खरेदी यावर कर लावण्याचा अधिकार केंद्राला असला तरी केंद्र मिळणारे उत्पन्न संबंधीत राज्यांना वाटून देते.

डॉ. लोकनाथन यांनी तामीळनाडूच्या विक्रीकर पद्धतीचा अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की, ८५ प्रतिशत विक्रीकर अशा व्यापाऱ्यांकडून वसूल केला जातो की, ज्यांची विक्री ५०,००० रु. पेक्षा जास्त आहे. हा निष्कर्ष इतरही राज्यांच्या बाबतीत खरा ठरु शकतो.

### ५) मनोरंजन कर

**(Entertainment Tax)**

सिनेमा, नाटक, सर्कस, इत्यादी मनोरंजक सेवा प्रदान करणाऱ्यांवर सेवा प्रित्यर्थ आकारलेल्या किमतीच्या आधारावर लावला जातो. हे सेवा प्रदान करणारे हा कर सेवा घेणाऱ्यांवर पूर्णता ढकलतात. १९५१-५२ मध्ये राज्य सरकारांना मनोरंजन करांपासून ६ करोड रुपये प्राप्त झाले. १९७२-७३ मध्ये हे उत्पन्न ७४.८ करोड रुपयांपर्यंत वाढले

# अपेक्षित प्रश्न

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) भारतीय कर रचनेचे स्वरुप स्पष्ट करा.

२) केंद्र सरकारच्या करांची माहिती द्या.

३) राज्य सरकारांच्या करांची माहिती द्या

**लघुत्तरी प्रश्न**

**ब) टिपा लिहा**

१) प्राप्तीकर (उत्पन्न कर)

२) भांडवली लाभ कर

३) संपत्ती कर

४) मालमत्ता कर

५) देणगी कर

६) केंद्रिय उत्पादन कर

७) केंद्रिय सीमा शुल्क

८) शेतसारा

९) कृषी उत्पन्न कर